माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ९८/२०२१**

**तक्रारकर्ता, श्री. परमेश्वर किसनाजी बुटले,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन**
हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी**
हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २६.०७.२०२३**

**तक्रारकर्ता** : अनुपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : अनुपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| ०१.०४.२०२१ | --- | १७.०६.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २७५२/२०१९ मध्ये दिनांक ०१.०४.२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २६.०७.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी तर्फे पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन हिंगणघाट, जि. वर्धा, श्री. वसंत शुक्ला उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी हिंगणघाट,जि. वर्धा अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. २७५२/२०१९ मध्ये दिनांक ०१.०४.२०२१ रोजी सुनावणी घेवून " जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती अर्जाला दिनांक १६.०९.२०१९ रोजी माहितीचे शुल्क रु. ३१/- भरण्याबाबत विलंबाने प्रतीसाद दिलेला आहे. त्यानंतर प्रथम अपीलीयअधिकारी यांनी सूनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. परंतु, सदर प्रकरणी अपीलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपीलार्थी यांचा दि. १४.०८.२०१९ चा माहिती अर्ज सहायक जन माहिती अधिकारी यांना दि. १६.०९.२०१९ रोजी विलंबाने प्राप्त झाल्यने व अपिलार्थी यांच्याशी संपर्क न झाल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला असून विनाशुल्क माहिती दि. २६.१०.२०२० रोजी रजिस्टर पोष्टाने पुरविण्यात आली आहे. अपीलार्थी यांना माहितीचे प्रदान झालेले आहे. " असे आदेशित प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक १२.०६.२०२१ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. द्वितीय अपील क्र. २७५२/२०१९ मध्ये दिनांक ०१.०४.२०२१ रोजी झालेल्या सुनावणीत अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याचा एकमेव मुद्दा उपस्थित केला आहे. जनमाहिती अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन हिंगणघाट, जि. वर्धा, यांनी दि. २६.१०.२०२० रोजी रजिस्टर पोस्टाने अपिलार्थी यांना विनामूल्य माहिती पुरविली आहे. परंतु अपिलार्थी यांनी मिळालेली माहिती अस्पष्ट असल्याने तक्रार अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन हिंगणघाट, जि. वर्धा, यांच्या स्तरावरुन अपिलार्थी यांना अभिलेखावर आहे त्या स्वरुपात उपलब्ध असलेली ३५ पृष्ठांची माहिती विनामूल्य प्रदान केली असल्याने सदर तक्रार निकाली काढणे संयुक्तिक ठरेल. पारित आदेशाचे याआधीच अनुपालन झाले असून अपिलार्थी यांना जोडपत्र-अ नुसार माहिती प्रदान केल्याची बाब लक्षात घेता तसेच आयोगाने दि. ०१.०४.२०१९ रोजी सदर प्रकरणी सुस्पष्ट आदेश दिले आहे. सबब, प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

ठिकाण : नागपूर
दिनांक : २६.०७.२०२३

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग

जावक क्र. 7280 दि. 29 DEC 2023